टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

एम. ए. मराठी, (भाग १)

मे २०११ परीक्षा

विषय : भारतीय साहित्यशास्त्र (M-104)

दिनांक : २१ /५/२०११ **गुण : १००** **वेळ : स. १०.०० ते दु. १.००**

सुचना : १. सर्व प्रश्न सोडवा.
२. सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.

प्रश्न १. अ) भामह, दंडी व कुंतक या मीमांसकांनी काव्याची कोणती लक्षणे सांगितली आहेत? **(२०)**

किंवा

ब) मम्मटाच्या काव्यप्रयोजनांची चर्चा करा.

प्रश्न २. अ) 'व्यंजना' या शब्दशक्तीची सविस्तर चर्चा करा. **(२०)**

किंवा

ब) 'ध्वनी हाच काव्याचा आत्मा' या आनंदवर्धनच्या व्याख्येचा परामर्श घ्या.

प्रश्न ३. अ) करुणरसातून काव्यानंदाची निर्मिती होते का? **(२०)**

किंवा

ब) ॲरिस्टॉलचा 'कॅथार्सिस' सिध्दान्त विशद करा.

प्रश्न ४. अ) वामनपूर्व रीतीविचाराचे स्वरूप स्पष्ट करा. **(२०)**

किंवा

ब) वामनाचा रीतीविचार सविस्तर स्पष्ट करा.

प्रश्न ५. टिपा लिहा. (कोणत्याही दोन) **(२०)**

१. भरताचा रससिध्दान्त.

२. जिज्ञासापूर्ती.

३. काव्यानंदाची उपपत्ती.

४. प्रतिभा आणि स्फूर्ती.